# नवी मुंबई महानगरपालिका

# Navi Mumbai Municipal Corporation

कार्यालय : नमुंमपा मुख्यालय, भूखंड क्र.१,
किल्ले गांवठाण जवळ, पामबीच जंक्शन, सेक्टर -१५ए,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
दूरध्वनी : ०२२-२७५६ ७०७०/१/२/३/४/५
फॅक्स : ०२२-२७५७७०७०

**Head Office:** Plot No.1,
Near Kille Gaothan, Palmbeach Junction,
Sector 15A, C.B.D. Belapur, Navi Mumbai -400 614.
Tel : 022 - 2756 7070 / 1/2/3/4/5
Fax : 022 - 2757 7070


जा. क्र. नमुंमपा./नरवि/बां.प./प्र.क्र. 20201CNMMC17104/ ९५८ /२०२१
दिनांक - ०४/०६/२०२१

प्रति,
मे. साई अशिर्वाद को. ऑ. हौ. सोसा. लि.,
मे. गुलमोहर को. ऑ. हौ.सोसा. लि., व
मे. उत्कर्ष को.ऑ.हौ.सोसा. लि.,
कंडोमिनियम क्र.३ व १८,
सेक्टर क्र. ९, वाशी, नवी मुंबई.

**प्रकरण क्र. 20201CNMMC17104**

**विषय : कंडोमिनियम क्र. ३ व १८, सेक्टर क्र. ९, वाशी या भूखंडावर रहिवास वापरासाठी पुनर्बांधणी प्रस्तावास बांधकाम परवानगी मिळणेबाबत.**

**संदर्भ :**
१. आपले वास्तुविशारद मे. लिलाधर परब आर्किटेक्ट अॅन्ड डिझायनर यांचे दिनांक २०/०५/२०१९, २४/०९/२०१९, २४/१२/२०१९ व ३०/११/२०२० रोजीचे प्राप्त प्रस्ताव.
२. या कार्यालयाचे भुखंड एकत्रिकरणाचे पत्र जा.क्र. नमुंमपा/ नरवि/ससंनर/६३९/२०२० दि.१४/०२/२०२०.
३. या कार्यालयाचे इरादा पत्र जा.क्र. नमुंमपा/ नरवि/ससंनर/६४२/२०२० दि.१४/०२/२०२०.
४. पर्यावरण विभाग (State Environment Impact Assessment Authority) यांचा दिनांक ०२/०३/२०२० रोजीचा नाहरकत दाखला.
५. या कार्यालयाचे शासनास पाठविलेले पत्र जा.क्र. नमुंमपा/१०६९/२०२० दि.०६/०३/२०२०.
६. उच्च उतुंग समिती (HRC) च्या दिनांक १२/११/२०२० रोजीची प्राप्त मंजुरी.
७. शासनाचे पत्र क्र. टिपीबी-४३२०/१६३/नवि-११, दिनांक २२/१२/२०२०.
८. अग्निशामन विभागाचा नाहरकत दाखला क्र.नमुंमपा / अग्नि. / मुख्या. / वाशी / १६३ /२०२१, दि.०८/०१/२०२१

महोदय,

कंडोमिनियम क्र.3 व १८ मधील इमारत क्र. २, ४ ते १८ (कंडोमिनियम क्र.३) व इमारत क्र. ६१ ते ८१ (कंडोमिनियम क्र.१८) सेक्टर क्र. ९, वाशी, नवी मुंबई या भूखंडावरील मोडकळीस आलेल्या एकूण ३७ इमारती निष्कासित करून त्याठिकाणी **रहिवास** वापराच्या पुनर्वसनाच्या इमारत क्र. १ व २ तसेच प्रोत्साहनापर इमारत क्र.१, २ व ३ इमारतीच्या पुनर्बांधणीस बांधकाम परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेस वरील संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त झाला आहे.

मे. साई अशिर्वाद को. ऑ. हौ. सोसा. लि., मे. गुलमोहर को. ऑ. हौ.सोसा. लि., व मे. उत्कर्ष को.ऑ.हौ.सोसा. लि., जे.एन.-२ टाईप इमारत क्र. २, ४ ते १८, कंडोमिनियम क्र.३ व इमारत क्र. ६१ ते ८१, कंडोमिनियम क्र.१८, सेक्टर – ०९, वाशी, नवी मुंबई येथील सिडकोने बांधलेल्या मोडकळीस आलेल्या इमारतींच्या नियोजित पुनर्विकासनाकरीता मा.आयुक्त यांनी संदर्भ क्र.२ मध्ये नमुद जा.क्र. नमुंमपा / नरवि / ससंनर / ३६९ / २०२० दिनांक : १४/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये सदर सोसायटींच्या भुखंडांचे एकत्रिकरण करणे व त्याअंतर्गत येत असलेल्या मोकळ्या जागा (Open spece) व बगीच्यांची फेररचना आणि परिसराचा भू-अभिन्यास करणे, यास मंजूरी दिली आहे. सदरच्या भु-अभिन्यासातील प्रस्तावित मोकळ्या भुखंडावरील प्रस्तावित बांधकाम परवानगीचे अनुषंगाने पर्यावरण प्रमाणपत्र प्राप्त करणेसाठी इरादापत्र (Letter of Intent) आपणास संदर्भ क्र. ३ जा.क्र.नमुंमपा / नरवि / ससंनर /६४२/२०२० दिनांक १४/०२/२०२० अन्वये देण्यात आले आहे.

कृ.मा.प.